# - प्रेस नोट -

दि. ०८/०७/२०२६

## मानखुर्द पोलीस ठाणे - खुनाचा प्रयत्न

दि. ०६/०७/२०२६ रोजी २३.२० वा. च्या सुमारास फिर्यादी किसन फुलचंद जयसवाल वय-३० वर्षे, रा. ठी. मानखुर्द, मुंबई, हे ज्योतिर्लिंग मेडिकलच्या जवळ, जय हिंद नगर सोनापुर, मानखुर्द, मुंबई, येथील सार्वजनिक शौचालय येथे नैसर्गिक विधी करीता गेले असता अटक आरोपी पुरुष वय वर्षे-३० हा तेथे आला व परिसरातील इसमांना विनाकारण शिवीगाळ करून दहशत करू लागला. फिर्यादी तेथे बाहेर पाऊस येत असल्यामुळे थांबले होते ते पाहुन अटक आरोपी याने फिर्यादी यांना शिवीगाळ केली आणि त्याच्या हातामध्ये असलेली धारदार कात्रीने फिर्यादी यांना जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने फिर्यादी यांच्या पोटा मध्ये डाव्या बाजुस एक गंभीर दुखापत केली,तसेच अटक आरोपी याने दुसरा वार केला तो फिर्यादी यांनी चुकवण्याचा प्रयत्न केला असता फिर्यादी याच्या डाव्या पायाच्या मांडीवरती खर्चटुन गेला तसेच अटक आरोपी याने जाताना फिर्यादी यांना पोलिसांकडे तक्रार केली तर जीवे ठार मारेन अशी धमकी दिली म्हणुन फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दि.०७/०७/२०२६ रोजीगु.र.क्र. ४२७/२६,कलम१०९,११८(१),११८(२),११५(२),३५१(३),३५२ बीएनएस २०२३ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

---------------------